ISSN 2231-5063 Impact Factor : 4.6052 (UIF) Volume - 6 | Issue - 1 | July - 2016

Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal
RNI : MAHMUL/2011/38887
ISSN No: 2231-5063
Impact Factor 2.2052 (UIF) [Yr. 2014]
3.4052 (UIF) [Yr. 2015]
4.6052 (UIF) [Yr. 2016]

GRT Golden Research Thoughts

# कौटुंबिक कलह सोडविण्यात गोंदिया जिल्हा महिला तक्रार निवारण केंद्राची भूमिका

डॉ. कल्पना राऊत
गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख ,
एस. जी. बी. महिला महाविद्यालय, तुमसर.

**सारांश**

प्रस्तुत शोधकार्याचा कौटुंबिक कलहाने ग्रस्त महिलांचा आणि असे कलह सोडविण्यासाठी मदतीचा हात पुढे करणा-या महिला तक्रार निवारण केंद्राशी संबंध आहे औद्योगिकरण, वैश्विकरण, आणिवकीकरण, अशा अंगडबंब संकल्पनाची चर्चा करण्यात सारा देश किंबहुना सारे विश्व गर्क असतांना कुटुंब त्याचे बदलते स्वरूप, ढासळत चाललेली कुटुंबव्यवस्था आणि त्यामुळे धोक्यात आलेले देशाचे स्वास्थ या गोष्टींकडे लोक गांभिर्याने पाहत नाही.



या संशोधन प्रकल्पाकरीता गोंदिया जिल्हा महिला तक्रार निवारण केंद्रात नोंदणी असलेल्या विविध प्रकरणापैकी एकंदरीत ३०० कलहग्रस्त कुटुंबातील महिलांचा अभ्यास करण्यात आला यात ग्रामिण भागातील १९८ व शहरी भागातील १६२ महिलांचा अभ्यास करण्यात आला.

## प्रस्तावना

आजचे युग हे नवनविन कल्पनांचे आणि त्या कल्पनांना प्रत्यक्ष अमलात आणू पाहणा-यांचे युग आहे भौतिक सुखासाठी जाईल. ते करण्यासाठी तत्पर असणा-यांचे हे युग आहे आणि या हव्यासापायी स्वत:चा आत्माही विंकण्याची लोकांची तयारी आहे. स्वत:च्या सुखाचे स्वप्न प्रत्यक्षात उरवण्यासाठी प्रसंगी दुस-याचा जीव घेण्याचीही लोंकाची तयारी आहे. समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ या सर्व बदलांकडे उत्क्रांतीच्या प्रक्रियेतील एक टप्पा म्हणून बघतायेत आणि हे बदल जुन्या पिढीला इच्छेने किंवा अनिच्छेने स्विकारणे अपरिहार्य आहे. तसेच चित्र दिसत आहे. समलिंगी विवाह, गे-संस्कृती लेसबियन विवाह, सरोगेट मदर, टेस्ट टयुब बेबी, स्पर्ग बॅक, लिव्ह-इन-रिलेशनशिप, कॉन्टॅक्ट मॅरेजेस, अशा विविध मनाला न पटणा-या अकल्पित संकल्पना नविन पिढीने जुन्या पिढीसमोर आणुण सोडल्या आहेत. आपण हसावे की रडावे अशा केविलवाण्या कात्रीत बुद्धीजीवी वर्ग सापडला आहे. विरोध केला तर पुरणमतवादी, रूढीवादी बुरसट विचाराचे असल्याचे आरोप सहन करावे लागतात आणि हे स्विकारले तर आपले सर्व संस्कार परंपरा मोडीत काढावे लागतील अशी विचित्र अवस्था निर्माण झाली आहे.

अपेक्षांचा डोलारा उभे करणारे पालक आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली दबलेली मुले असेही एक चित्र समाजात पाहायला मिळते. आणि या सर्वांची परिणती म्हणजे न संपणारी कुटुंबातील समस्यांची सुरू होणारी श्रृंखला आणि ही श्रृखंला अणुस्फोटाच्या न संपणा-या श्रृंखलेसारखी आहे. आमच्या कुटुंबात एकही समस्या नाही असे म्हणणारे एक तर खोटं बोलत असतील किंवा पृथ्वीवर राहत नसतील असेच म्हणावे लागेल.

कुटूंबातील कलहाची वैश्विक व्याप्ती लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधनात विदर्भातील गोंदिया जिल्हयातील महिला तक्रार निवारण केंद्राच्या भूमिकेच्या सखोल अभ्यास करण्यात आला आहे. गोंदिया जिल्हयातील महिला तक्रार निवारण केंद्राची संख्या ०५ आहे तर जिल्हास्तरांवर २ तक्रार निवारण केंद्र कार्यरत आहेत. कौटुंबिक कलह सोडविण्यात गोंदिया जिल्हा महिला तक्रार निवारण केंद्राची काय भुमिका आहे? महिला तक्रार निवारण केंद्राच्या कार्याचे स्वरूप काय आहे? महिलांना महिला तक्रार निवारण केंद्राची मदत घेण्यासाठी कोण व कसे प्रवृत्त करतात? कौटुंबिक कलहाची कारणे कोणती आहेत? महिला तक्रार निवारण केंद्रांद्वारे समुपदेशन घेणा-या केसेसमध्ये ग्रामीण व शहरी कुटुंबाचे प्रमाण किती आहे? कौटुंबिक कलह होण्यात शिक्षित आणि अशिक्षित कुटुंबाची टक्केवारी किती आहे? कुटुंब पद्धतीत आणि कौटुंबिक कलहात काही संबंध आहे काय? कौटुंबिक कलहाचे प्रमाण दरवर्षी वाढते काय? व कोणत्या कारणामुळे वाढते? महिला तक्रार निवारण केंद्राच्या समपदेशनानंतर लोकांच्या जीवन पद्धतीत कोणते बदल झालेत? महिला तक्रार निवारण केंद्राच्या समुपदेशनानंतर कौटुंबिक संबंधात कितपत सुधारणा झाली? लोक आपआपसातील तक्रारी महिला तक्रार निवारण केंद्राच्या माध्यमातून कशा सोडवितात? आणि कौटुंबिक कलह कमी करण्यासाठी मदत करणा-या संस्थांची कार्यक्षमती वाढविण्यासाठी कुटुंबाने, समाजाने व शासनाने काय केले पाहिजे? या विविध बाबींचा विचार करण्यासाठी आणि त्या संदर्भातील तथ्ये शोधण्यासाठीच कौटुंबिक कलह सोडविण्यात गोंदिया जिल्हा महिला तक्रार निवारण केंद्राची भूमिका हा विषय संशोधनाकरीता निवडलेला आहे.

**सारणी क्र. १ कौटुंबिक समस्या तक्रार दाखल केंद्र**

| अ.क्र | कौटुंबिक समस्या मार्गदर्शन केंद्र | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | महिला तक्रार निवारण केंद्र | १६२ | ५४% |
| २. | पोलिस स्टेशन | ९९ | ३३% |
| ३.. | तंटामुक्ती समिती | ३५ | ११.६६% |
| ४. | महिला सुरक्षा परिषद | १ | ०.३३% |
| ५. | महिला विषयक संस्था | १ | ०.३३% |
| ६. | जात पंचायत | १ | ०.३३% |
| ७. | ईतर | १ | ०.३३% |
| | एकूण | ३०० | १००% |

वरील सारणीवरून कौटुंबिक कलह निवारण्यात महिला तक्रार निवारण केंद्राची भूमिका आकडेवारीवरून सहज स्पष्ट होते ५४ टक्के महिला कौटुंबिक कलह निवारणासाठी या केंद्रावर विसंबुन राहतात. नि:शुल्क उपलब्ध सेवा, ऐकीव माहिती इत्यादी मुळे महिला या केंद्रापर्यंत तक्रार दाखल करण्यासाठी पोहचतात. तर ३३ टक्के महिला विविध ठिकाणी पोलिस स्टेशन ला तक्रार निवारण केंद्राकडेच पाठविले जातात. म्हणजेच एकूण ८७ टक्के महिलांना या केंद्राद्वारे मार्गदर्शनपर सेवा उपलब्ध होते. स्थानीय पातळीवर तंटामुक्ती समितीची स्थापना करण्यात आल्यामुळे ११.६६ टक्के महिला स्थानीय मार्गदर्शकांचया मदतीने कौटुंबिक कलह सोडविण्याचा प्रयत्न करतात. इतर संस्थाचा सहभाग अतिशय नगण्य आहे. त्याचप्रमाणे महिलांची सुरक्षा व समस्या विषयक गरजा लक्षात घेवून महिला सुरक्षा परिषद व महिला बचत गट, महिला मंडळे स्थापन करण्यात आली आहेत. ती अल्प प्रमाणात का होईना ती कलह विषयक समस्या सोडविण्यात मोलाचे सहकार्य करतात.

**सारणी क्रं. २ उभय पक्षात तडजोडीचे प्रमाण**

| अ.क्र | तडजोडीचे प्रमाण | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पुर्णत: | ५० | १६.६६% |
| २. | काही प्रमाणात | १५५ | ५१.६६% |
| ३. | अल्प प्रमाणात | ७२ | २४.००% |
| ४. | मुळीच नाही | २३ | ७.६६% |
| | एकूण | ३०० | १००% |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, तडजोड हे पुर्ण समाधान बहुतांश देत नाही. कारण प्रत्येकाला काहीतरी त्याग करावा लागतो. काही तरी नुकसान सोसावे लागते. ते स्विकारण्याची मानसिकत तयारी बरेचदा उभय पक्षाची किंवा एका पक्षाची नसते. त्यामुळे पुर्णत: तडजोडींचे प्रमाण हे १६.६६ टक्के आहे तर तडजोड म्हणजे काही सोडणे काही मिळविणे हा नियम ५१.६६ टक्के उत्तरदात्यांनी स्विकारल्या परंतु विपरीत स्थितीत अतिशय विरोधाभास अपेक्षेतील अधिक अंतर, योग्यतेचा अभाव इत्यादी कारणामुळे २४ टक्के तक्रारकर्त्यांनी अल्पप्रमाणात तडजोड स्विकारली आहे. तर ७.६६ टक्के कुटुंबियांमध्ये अजिबात तडजोड झाली नाही.

**सारणी क्रं. ३ कलह सोडविण्यासाठी सहाय्यकारी व्यक्ती**

| अ.क्र | सहाय्यकारी व्यक्ती | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | स्वसुचना | २५ | ८.३३: |
| २. | कुटुंबातील सदस्य | ३० | १०% |
| ३. | ग्रामस्थ | २५ | ८.३३% |
| ४. | इतर नातेवाईक | ५४ | १८% |
| ५. | तंटामुक्ती समिती | ४४ | १४.६६% |
| ६. | कुटुंबप्रमुख | ३ | १% |
| ७. | अनुभवी व्यक्ती | १० | ३.३३% |
| ८. | महिला तक्रार निवारण केंद्र | ९९ | ३३% |
| ९. | एआरटी सेंटर | – | – |
| १०. | अल्कोहोलीक अनोंनिमस | ४ | १.३३% |
| ११. | ठतर | ६ | २% |
| | एकूण | ३०० | १००% |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, कौटुंबिक कलह सोडविण्यासाठी महिला तक्रार निवारण केंद्राची इतर पर्यायांपेक्षा सर्वात जास्त ३३ टक्के मदत होते असे स्पष्ट होते. इतर नातेवाईकही मदत करतात असे १८ टक्के महिलांचे मत आहे. तर तंटामुक्ती समितीही या प्रक्रियेत मदत करते असे १४ टक्के महिलांनी मत नोंदविले आहे. यात कुटुंबातील सदस्यांचा वाटा हा १० टक्के आहे. स्वसुचना, ग्रामस्थ, कुटुंबप्रमुख, अनुभवी व्यक्ती, अल्कोहोलीक अनॉनिमस संघटन व अन्य घटकही कमी अधिक प्रमाणात कौटुंबिक कलह सोडविण्यासाठी मदत करतात. एआरटी सेंटर विषयी लोंकामध्ये अजुनही बहुतांशी जागृकता नाही. एड्स सारखा आजार असल्यास कुटुंबाला हे केंद्र योग्यप्रकारे मार्गदर्शन व सहकार्य करते. त्याचप्रमाणे अल्कोहोलीक अनॉनिमस संस्था ही दारू पिणा-यासाठी दारू सोडविण्यास स्वयंस्फुर्ततेने, स्वखर्चाने मार्गदर्शन व सहयोग करते. हयामुळे कौटुंबिक कलह सोडविण्यास हया संघटनेची मोलाची मदत होते.

**सारणी क्रं. ४ कलहाचे प्रमाण कमी करण्यासाठी स्व प्रयत्न**

| अ.क्र | कलहाचे प्रमाण कमी करण्यासाठी महिलांचे स्वप्रयत्न | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | तडजोड | ३७ | १२.३३% |
| २. | भांडण | ९ | ३% |
| ३. | शांत राहणे | ८८ | २९.३३% |
| ४. | इतरांवर राग काढणे | ३० | १०% |
| ५. | सर्व गुपचुप सहन करणे | ६६ | २२% |
| ६. | स्व-नियंत्रण | ४३ | १४.३३% |
| ७. | लक्ष विकेंद्रीत करणे | १५ | ५% |
| ८. | सखोल स्वमुल्यांकण | १२ | ४% |
|  | एकूण | ३०० | १००% |

स्त्रीला कितीही दुषणे दिली तरी महिला कुटुंबासाठी, कुटुंबाच्या इभ्रतीसाठी २९.३३ टक्के म्हणजे सर्वाधिक महिला शांत राहतात. तर २२ टक्के महिला सर्व अन्याय, अत्याचार शांतपणे सहन करतात. १४.३३ टक्के स्वत:वर नियंत्रण ठेवून बघतात. याचाच अर्थ अत्याचार, अन्याय सहन करणे, सहन करत राहणे व तसेच दु:खात खितपत जगत राहण्याची सवय या महिलांना लागलेली आहे. नशिबांचा भाग म्हणून पुरूष असे वागतात, हे आपल्या नशिबातच आहे,

बहेर इज्जत राहणार नाही. या सर्व विचारांच्या दडपणाखाली महिला जगात असतात. ब-याच महिला वयानुसार मन मारून जगायला शिकला आहेत कारण स्त्री स्वातंत्र्य अधिकार तिचे सुखदु:ख याची जाणीव पुरूष वर्गाला नसते किंवा त्यावर ते विचार करीत नाही. महिलांवर अत्याचार होतांना ते लहानपणापासून पाहत असतात. त्यामुळे पुर्वानुभवातून अन्याय करतांना तयाची बीची पुरूषांना जाणवत नाही आणि स्त्रीयांही वादविवाद नको, घरात भांडण नको म्हणून पुर्वसुचना पुर्वग्रहानुसार अन्याय, अत्याचार जीवनाचा एक अविभाज्य घटक म्हणून स्विकार करून जगत राहतात. १४.३३ टक्के गृहिणी कोणत्याही परिस्थितीत स्वत:वर नियंत्रण ठेवतात. परिस्थितीचे आकलन समजूतदारपणा, विचारशक्ती, दुरदर्शिता, वास्तविकतेचे भान, आई-वडिलांच्या सुखदु:खाची, तर १२.३३ टक्के महिला तडजोडीचा मार्ग स्विकारतात. दोघांचेही विचार, अपेक्षा ज्ञान योग्यता यांच्याशी तडजोड करून कलह कमी करण्याचा प्रयत्न करतात. ५ टक्के महिला चतुराईचा उपयोग करून कलहापासून लक्षविकेंद्रीत करण्याचा प्रयत्न करतात. ज्यामुळे शक्यतोवर कलह टाळला जातो. ४ टक्के महिला परिस्थती वास्तव, स्वभाव, कोटुंबिक भिन्नता, योग्यतेतील अंतर, स्वत:चे सामाजिक स्थान, सुरक्षा इत्यादींचा बारकाईने विचार करून स्वत:च्या चुकांचाही खोलवर विचार करतात.

एकूण १३ टक्के महिला परिस्थितीचा राग इतरांवर काढून स्वत:ला नियंत्रित राखण्याचा प्रयत्न करतात. तर या पैकी ३ टक्के मात्र कुटूंबात भांडण करतात ज्यामुळे त्यांची प्रतिष्ठा, समाधान, कुटूंबाचे स्थैर्य विनाशाच्या टोकला पोहचते. बरेचदा स्वभाव वैशिष्टे दाहकवास्तव, अत्यंत प्रतिकुल परिस्थिती जाणूनबुजून लादला जाणारा अन्याय इत्यांदीच्या विरोधात हया १३ टक्के महिला कलहासाठी खंबीरपणे उभ्या राहतात व सामाजिक व कौटुंबिक टिकाऱ्याला बळी पडतात. याचाच अर्थ कलहाचे प्रमाण कमी करण्यासाठी वैचारीक पातळीवर बारकाईने दुरदर्शिपणाने विचार करून कलहाचे प्रमाण कमी करता येवू शकते. असे असले तरी २२ टक्के महिला सोडून इतर सर्व पिढीत महिला परंपरागत स्त्री भूमिकेचा आदर्श जपणूकीमुळे कुटुंबातील कौटुंबिक कलहाचे प्रमाण कमी ठेवण्यास मदत करतात. यासाठी दृकश्राव्य साधनाद्वारे वेळापत्रक आखुन योग्य चित्रफिती चे प्रदर्शन आयोजित करून कौटुंबिक कलह सोडविण्यास उभयपक्षी मार्गदर्शन करून चर्चा करावी.

## निष्कर्ष

आवेश, नकारात्मकता, चुकीचा दृष्टीकोन, चुकीचे पुर्वग्रह इत्यादींमुळे तडजोड करणे कठीण जाते. भिन्नता स्विकारून ती निभावने अतिशय कठीण आहे. त्यामुळे महिला तक्रार

निवारण केंद्राची भुमिका कौटुंबिक कलह सोडविण्यासाठी महत्वाची ठरते. शासनाकडून ही सेवा उपलब्ध झाल्यामुळे दाहक वास्तव स्विकार करण्याची मानसिकता उभय पक्षात चर्चा करून तयार केली जाते. त्यामुळे लोक विश्वासाने कुटुंबातील केस दाखल करण्यासाठी येतात.

वैचारीक पातळी उंचावणे, कोणत्याही समस्येवर गंभीरपणे विचार करून समस्यांचे समाधान शोधायला शिकणे व शिकविणे ही महिलांची महत्वाची गरज स्वत:च आपल्या समस्यावर गंभीरपणे विचार करून कुटुंबात एकत्रित सर्वांनी बसुन विचारमंथन करून कुटुंबासाठी एक उत्तम उपाययोजना शोधणे आवश्यक आहे. यासाठी स्थानिय तंटामुक्ती सदस्य, महिला बचत गट, महिला मंडळाचा निर्णयक्षम व्यक्ती यांनी एकत्रीत बसुनही कौटुंबिक समस्येवर तोडगा शोधणे आवश्यक आहे. ज्यामुळे समस्या लगेच सोडविता येवू शकते.

## संदर्भग्रंथ सूची


- ❖ आगलावे, प्रदिप, २००७, ‘नमुना निवडीचे तंत्र’, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- ❖ आगलावे, प्रदिप, २०००, संशोधन पद्धती शास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.
- ❖ आगलावे, प्रदिप, २००३, भारतीय समाज संरचना आणि समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- ❖ कुळकर्णी प्रा. पी. के., सामान्य समाजशास्त्र. श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर
- ❖ गोऱ्हे डॉ. निलम, कौंटुबिक हिंसा विरोधी कायदा, स्त्री आधार केंद्र, पुणे, २००७
- ❖ गोऱ्हे डॉ. निलम, अन्यायग्रस्त महिलांची मैत्रीण, स्त्री आधार केंद्र, पुणे, द्वितीय आवृत्ती १९९८